

# किल्ले शिवनेरी

भास्कर नारकर

# किल्ले शिवनेरी

## भास्कर नारकर

ई साहित्य प्रतिष्ठान

**पुस्तकाचे नांव किल्ले शिवनेरी**

प्रकार : दुर्ग दर्शन

लेखक : भास्कर विजय नारकर
B.E. (Electronics & Telecommunication)
सहसंस्थापक – शिलेदार ग्रुप
वय : २१ वर्ष
ई-मेल : bnarkar497@gmail.com
ब्लॉग : www.bhaskarnarkar.blogspot.in
फेसबुक पेज - www.facebook.com/shiledar.maharashtra

सर्व फ़ोटो: भास्कर नारकर,

नकाशा सौजन्य: www.trekshitiz.com

प्रकाशन: ई साहित्य प्रतिष्ठान, १९ फ़ेब्रुवारी २०१५

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

©esahity Pratishthan® 2015

# अर्पण पत्रिका

महाराष्ट्राच्या अधिमनावर राज्य करणाऱ्या

स्वराज्य संस्थापक

छत्रपती शिवाजी महाराजांना

हे पुस्तक अर्पण

...भास्कर नारकर



# ओळख____

महाराष्ट्राला किल्ले शिवनेरीची वेगळी ओळख करून देण्याची गरज नाही. महाराष्ट्रातील प्रत्येकाच्या मनात शिवनेरीचे स्थान अढळ आहे. आपल्याला शालेय शिक्षणात सर्वप्रथम याच किल्ल्याची ओळख होते. इतिहासाच्या पुस्तकात शिवजन्मस्थानाची ती दुमजली इमारत आपण सर्वांनी पहिलीच असेल.

पण आपल्याला शिवनेरीबद्दल किती माहिती आहे? शहाजी महाराजांनी शिवाजी महाराजांच्या जन्मासाठी शिवनेरीच का निवडला? शिवनेरी किल्ल्यावर शिवजन्मस्थानाशिवाय कोणत्या वास्तू आहेत? आज शिवनेरी कोणत्या परिस्थितीत आहे? शिवाजी महाराजांच्या जन्मस्थानाचे पावित्र राखले जात आहे का? यांसारख्या अनेक प्रश्नाचा मागोवा आपण या पुस्तकाद्वारे घेणार आहोत.

एकविसाव्या शतकात साहित्य ई-बुकच्या रूपाने अधिक वाचकांपर्यंतर पोहोचत आहे. या काळात ई-बुकमुळे लेखन आणि इंटरनेट यांची सांगड घालता येणे साध्य झाले आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून मी एक नवीन प्रयोग केला. शिवनेरी किल्ल्यावरील प्रेक्षणीय स्थळांच्या विडीओ लिंकस (Links) या पुस्तकात आपल्याला उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे माझ्या या प्रवासातील क्षण आपल्याला ही अनुभवता येणार आहे. तर चला माझ्यासोबत शिवनेरीच्या चढाईला...

– भास्कर नारकर

२०१५ वर्षातील ट्रेकिंगची सुरुवात किल्ले शिवनेरीपासून करायचे ठरले. या वर्षातील पहिल्यावहिल्या ट्रेकमध्ये मला माझ्या आई आणि बहिणीची सोबत लाभणार होती. नेहमीच्या सवयीप्रमाणे किल्ल्यावर जाणाऱ्या वाटा, किल्ल्यावरील प्रेक्षणीय ठिकाणे यांची माहिती करून घेतली.

जुन्नर हे शिवनेरीच्या पायथ्याचे गाव, त्यामुळे मुंबईहून जुन्नरला जाणाऱ्या एस.टी. बसेसबद्दल माहिती शोधू लागलो. मुंबईवरून जुन्नरला दोन मार्गांनी जाता येते. यातील पहिला कमी वेळ घेणारा मार्ग म्हणजे “कल्याण-माळशेजमार्गे-जुन्नर”, ११३ किमीचे हे अंतर कापायाला सुमारे अडीज तास लागतात आणि दुसरा अधिक वेळ घेणारा “मुंबई-लोणावळा-मंचर-नारायाणगाव-जुन्नर” असा काहीसा वळसा घेणारा मार्ग, २०० किमीचे हे अंतर कापायला ४ ते ५ तास लागतात.

लांबचा प्रवास आणि कुटुंबासोबत जात असल्याने एस. टी. चे आरक्षण करून जाणे योग्य वाटले. सुरुवातीस सकाळी कल्याणवरून माळशेजमार्गे जुन्नर गाठावे आणि सायंकाळच्या एस.टी.ने मुंबई किंवा कल्याणला परतावे असा बेत होता पण एस.टी. महामंडळाच्या संकेतस्थळावर जुन्नरहून संध्याकाळची आरक्षण असलेली एस.टी. बस नव्हती. रात्री ८ नंतरच्या काही बसेस होत्या पण त्या लोणावळामार्गे येणाऱ्या म्हणजे सुमारे ४ ते ५ तासाचा वेळ लागून मुंबईला मध्यरात्री पोहोचणार, त्यामुळे हे नियोजन रद्द करावे लागले.

दुपारी २:१५ वाजता जुन्नरहून माळशेजमार्गे कल्याणला येणाऱ्या बसने मुंबईला परतणे सोयीचे वाटले. साहजिकच यासाठी भल्या पहाटे शिवनेरी गाठणे क्रमप्राप्त होते. या नियोजनानुसार शेवटी मुंबईहून रात्री ११:३० च्या लोणावळामार्गे जुन्नरला जाणऱ्या आणि दुसऱ्या दिवशी दुपारी २:१५ च्या जुन्नरहून माळशेजमार्गे कल्याणला येणाऱ्या बसेसमध्ये जागा आरक्षित केल्या.

६ जानेवारीच्या रात्री जेवण आटोपून कुर्ला नेहरूनगर गाठले. ११:३० वाजता अगदी वेळेत बस सुरु झाली. रात्रीची वेळ असल्याने ट्रफिकचा प्रश्न नव्हता. १२:३० वाजता नव्याने सुरु झालेल्या खारघर टोलनाक्याजवळ वाहतूक कोंडीमुळे बसला १५ ते २० मिनिटे थांबावे लागले. जेथे मध्यरात्री वाहनांना १५ ते २० मिनिटे थांबावे लागत असेल तेथे दिवसा ऐन गर्दीच्या वेळात या नवीन टोलनाक्याजवळ किती वेळ वाया जात असेल असा प्रश्न पडला. शिवाय इंधनाचे नुकसान ते वेगळेच..

खारघर टोलनाक्यानंतर १ वाजता बसने पनवेल गाठले. पनवेलनंतर मात्र बसचालकाने पारंपारिक शैलीत बस पळवायला सुरुवात केली. खोपोलीनंतर खंडाळा घाटमार्गे बसने २:१५ वाजता लोणावळा गाठले. “बस १० मिनिटे थांबेल” अश्या बसवाहकाच्या सुचनेनंतर स्वेटर घातलेली आणि शाल लपेटलेली अनेक माणसे खाली उतरली. मी मात्र "कुठे आहे थंडी?" अश्या भावाने त्यांच्याकडे पाहत होतो.. तळेगाव, चाकणनंतर मात्र माझा हा अविर्भाव गळून पडला. शेवटी गपचूप जाकेट काढून अंगावर चढवला. राजगुरुनगर, मंचर, नारायणगाव करीत बस ४:४५ वाजता जुन्नर एस.टी. आगारात पोहोचली.

जुन्नरला उतरणारे आम्ही निवडक ४-५ प्रवासी होतो. येथे भुताच्या चित्रपटातील सेट शोभावा असे दृश्य होते. आम्ही ४-५ प्रवासी सोडले तर कोणी चिटपाखरू ही नव्हते. आगारातील चौकशीची खिडकी ही रिकामीच. जुन्नरमध्ये सकाळी नाश्ता करून शिवनेरीकडे जाण्याचा विचार होता पण जेथे आगारातील चौकशी कक्ष रिकामा होता तेथे आगारातील उपहारगृह उघडे असण्याच्या प्रश्नच नव्हता. एस.टी. आगारातून बाहेर आल्यावर कोठे नाश्ता मिळते का हे शोधायचा प्रयत्न केला पण गुलाबी थंडीत पहाटे ५ वाजता कोण बरे आमच्या साठी नाश्ता बनवत बसेल?

जुन्नर गुलाबी थंडीत झोपलेला असताना आम्ही शिवनेरीच्या वाटेवर लागलो. जुन्नर एस.टी. आगारापासून ५ मिनिटाच्या अंतरावर चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा घोड्यावरील पुतळा आहे. येथे महाराजांच्या पुतळयामागे आपल्याला शिवनेरीचे दर्शन होते.

महाराजांच्या पुतळयापासून डावीकडे वळून आम्ही शिवनेरी किल्ल्याला समांतर चालू लागलो. चांदण्याच्या शीतल प्रकाशात कुडकुडत आम्ही वाट तुडवत होतो. सकाळी फेरफटका मारणारे काही सोडले तर रस्ता रिकामाच होता. जुन्नर एस.टी. आगारापासून शिवनेरी किल्ल्याच्या पायऱ्यापर्यंतचे अंतर सुमारे ३ किमी आहे. १ ते १.५ किमी चालल्यानंतर एक मंदिर लागले, मंदिरासमोरील उजवीकडील वाटेने आम्ही शिवनेरीच्या पायऱ्याकडे चालू लागलो. जुन्नर एस.टी. आगाराहून सुमारे १ तासाच्या पायपिटीनंतर आम्ही शिवनेरीच्या

पायऱ्याजवळ पोहोचलो. रस्ता उत्तम असल्याने स्वतःचे वाहन असल्यास थेट शिवनेरीच्या पायथ्यापर्यंत वाहन आणता येते.

अंधारात शिवनेरीजवळ जाताना दुरून कुत्रांच्या भुंकण्याचा आवाज येत होता. शिवनेरीच्या पायऱ्या जवळ येताच ते आमच्यावरच भुंकत होते हे पटले पण चोहोबाजूनी भुंकण्याचा आवाज येत असला तरी अंधारामुळे कोणीच दिसत नव्हते. शिवनेरी किल्ल्याच्या पायऱ्याजवळ झोपलेल्या काकांची मात्र त्या आवाजामुळे झोपमोड झाली. पायऱ्याजवळ येताच त्यांची एक पाळीव कुत्री भुंकत आमच्याकडे झेपावली पण काकांनी तिला हटकले.

शिवनेरीला भेट देणारे पर्यटक येथे एका रजिस्टरमध्ये आपली नावे आणि कुठून आले अशी माहिती नोंदवतात. काकांच्या "कोण गावातून आला?" या प्रश्नावर आमचे "मुंबई" हे उत्तर ऐकून काकांना आश्चर्य वाटले. शिवनेरी किल्ला पाहण्याची वेळ सकाळी ६ ते सायंकाळी ५ पर्यंत असल्याने आम्ही त्यादिवशी पहिलेच पर्यटक होतो.

६ वाजले तरी अद्याप सूर्योदय झाला नव्हता, आम्हाला शिवनेरी किल्ल्यावरून सूर्योदय पाहण्याची पर्वणी लाभणार होती. लवकर आल्याने आरामात गड पाहता येणार होता. नजीकच्या काळात शिवनेरी किल्ल्याचे पुनर्बांधणीचे काम झाले आहे. गडावर जाणऱ्या पायऱ्या, गडावरील अनेक वास्तूची या काळात पुनर्बांधणी केली गेली. शिवनेरीच्या पायऱ्यांच्या सुरुवातीस उजवीकडे “सुरुवातीचे शिवनेरीचे स्वरूप आणि आता पुनर्बांधणी नंतरचे स्वरूप” दाखवणारा फलक पाहिला.

पुनर्बांधणीनंतर गडावर जाणाऱ्या पायऱ्या उत्तम परिस्थितीत असल्याने कुटुंबातील सर्व सदस्यांना गड चढणे सुकर झाले आहे. शिवनेरीचे एक मुख्य आकर्षण म्हणजे त्याचे सात दरवाजे. पायऱ्या चढायला सुरुवात झाल्यावर समोरच महादरवाजाचे दर्शन झाले पण अंधार असल्याने दरवाजांचे छायाचित्र परतीच्या वेळीस घ्यावे लागणार होते.

महादरवाजानंतर काही मिनिटांनी आम्ही गणेश दरवाजातून पुढे चढू लागलो. त्यापुढे पिराचा दरवाजा, हत्ती दरवाजामधून आपण पायऱ्या चढत जातो. काही ठिकाणी वाटेच्या बाजूला शोभेची झाडे वाढवून छोट्या बागा बनवल्या आहेत. हत्ती दरवाजापुढे पायऱ्यानी मेणा दरवाजा आणि कुलूप दरवाजामधून ७ च्या सुमारास आम्ही शिवनेरीवर पोहोचलो. शिवनेरीच्या सुमारे ४०० पायऱ्या चढायला आम्हाला १ तास लागला. वातावरणात गारवा असल्याने थकवा जाणवला नव्हता. सतत ट्रेक करणाऱ्या ट्रेकरसाठी शिवनेरीची चढाई फारच सोपी आहे.

कुलूप दरवाजातून वर आल्यावर डावीकडे अंबरखाना पहावयास मिळतो. पूर्वी या अंबरखान्याचा उपयोग धान्य साठविण्यासाठी केला जात असे. अंबरखाना प्रशस्त आहे. इ.स. १६७३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीतील डॉ जॉन फ्रायर याने या किल्ल्याला भेट दिली. त्याने आपल्या साधनग्रंथात, या किल्ल्यावर हजार कुटुंबांना सात वर्षे पुरेल एवढी शिधासामुग्री आहे असा उल्लेख केला आहे. अंबरखान्याच्या छतावर सूर्यप्रकाशासाठी बनवलेले झरोखे आढळले. अंबरखान्याच्या एका बाजूने १०-१२ पायऱ्या चढून आम्ही अंबरखान्याच्या

छतावर चढलो. येथेच एका बाजूला चंद्र तर दुसऱ्या बाजूला सुर्य असेल दृश्य पहावयास मिळाले. येथून वडूज धरणाच्या जलाशयाचे विहंगम दर्शन होते.




**अंबरखाना**

अंबरखान्यापासून जवळच जमिनीवर महाराष्ट्राच्या नकाशाचे भलेमोठे चित्र रेखाटलेले आहे. अंबरखान्यापासून दोन वाटा निघतात. उजवीकडील वाट समोरच असणाऱ्या टेकडीवर जाते. या टेकडीवर कोळी चौथरा आणि इदगाह आहे, डावीकडील वाट शिवकुंजापाशी घेऊन जाते. आम्ही डावीकडील वाटेने शिवकुंजकडे निघालो.

वाटेत काही अंतरानंतर डावीकडे खालील बाजूस काही पाण्याच्या टाक्या पहावयास मिळाल्या. गडावर वृक्षांरोपण आणि सुशोभित झाडांची लागवड केल्याने गडाला सौंदर्य प्राप्त झाले आहे. शिवशाहीत झाडांना अनन्य साधारण महत्त्व होते. "झाडे लेकुरे आपली, लेकारांसारखी जपावी" हा शिवाजी महाराजांचा संदेश विकासाच्या नावाखाली झाडांची कत्तल करणाऱ्या सरकारी यंत्रणा, बांधकाम व्यवसाईक आणि एकूणच समाजासाठी आजही मूलगामी आहे.



शिवकुंजाकडे जाणारा मार्ग

अंबरखान्यापासून ५-१० मिनिटात आम्ही गंगा-जमुना टाक्याजवळ पोहोचलो. कातळ कोरून या आयताकृती टाक्या बांधल्या आहेत. शिवनेरीबद्दलच्या इंटरनेटवरील माहितीत "गंगा व जमुना या टाक्यांमध्ये बारामही पिण्याचे पाणी उपलब्ध आहे" असे लिहिले असले तरी आम्हाला पाणी पिण्यायोग्य निश्चितच वाटले नाही. पाण्यात कचरा पडलेला आढळला. पाणीही हिरवट होते.



**गंगा जमुना टाके**

YouTube Link

गंगा जमुना टाके : http://youtu.be/Zt1y5uFX4Yg

गंगा-जमुना टाक्यासमोरच शिवकुंज नामक वास्तू आहे. तेथील फलकावर या इमारतीची कोनशीला महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते शिवजयंती दिनी, २७ एप्रिल १९६० रोजी स्थापित केल्याचे लिहिलेले आढळते. जिजाऊच्या पुढ्यात असलेला बालशिवाजी, हातातील छोटी तलवार फिरवीत आईला आपली भव्य स्वप्ने सांगत आहे, अशा आविर्भावातील मायलेकरांचा पुतळा शिवकुंजामध्ये बसविला आहे. शिवकुंजाचे दरवाजे बंद होते त्यामुळे लोखंडी जाळीच्या दरवाज्यातून पाहूनच आम्हाला समाधान मानावे लागले. शिवकुंजाच्या दारासमोरून शिवजन्मस्थान, हमामखाना, कमानी मशीद असा प्रदेश निहाळता येतो.



शिवकुंज

YouTube Link

शिवकुंज: http://youtu.be/-LZxUW_g7gI

पहाटे नाश्ता न केल्याने आता मात्र पोटात कावळे ओरडत होते. शिवकुंजासमोर उजव्या बाजूस एका झाडाखाली घरून आणलेला खाऊ खाल्ला. उजव्या बाजूस नजर जाताच धक्काच बसला. प्लास्टिकच्या पिशव्या, पाण्याच्या बाटल्या अश्या कचऱ्याचा खच पडला होता. ते दृश्य पाहून शिवजन्माचे सौभाग्य लाभलेल्या शिवनेरी किल्ल्याचे आपण पावित्र्य राखत आहोत का? हा प्रश्न मनात उभा राहिला.

ते दृश्य आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांवरील प्रेम, श्रद्धा आणि निष्ठेवर प्रश्न उठवणारे वाटले. याबाबत स्वच्छता कर्मचारी आणि शासनावर तरी किती खापर फोडावे? जर पर्यटकानी आपल्या देशाची ओळख असणाऱ्या अश्या वास्तूजवळ कचरा न टाकता आपल्या सोबत स्वतःचा कचरा घरी नेला तर स्वच्छता कर्मचाऱ्यांची गरजच काय? आपण आपल्या घरी कचरा करीत नाही, कोणी काय बोलेल या विचाराने आपले घर स्वच्छ ठेवतो मग आपल्या पुरातन वास्तूजवळ कचरा का दिसावा? याचाच अर्थ कि आपण आपल्या पुरातन वास्तूंना आपले मनात नाही. महाराष्ट्रातील सर्वच किल्ल्यांवर हेच दृश्य पहावयास मिळते.

काही महिन्यांपूर्वी याच प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी आम्ही "शिलेदार" नामक एक ग्रुप तयार केला. किल्ल्यांवर नुसते ट्रेक न करता ज्या ज्या किल्ल्यांना भेट देणार तेथे स्वच्छता मोहीम राबवायची असा संकल्प केला.

तांदुळवाडी आणि प्रबळगड ट्रेकमधील स्वच्छता मोहीमेत प्लास्टिकच्या पिशव्या, पाण्याच्या बाटल्यासोबत दारूच्या बाटल्या उचलताना वाईट वाटले. शिवाजी महाराजांना त्यांच्या किल्ल्यांचा दारूचे अड्डे म्हणून होणारा वापर पाहून किती क्लेश होत असेल. कदाचित ते स्वतःलाच "कोणासाठी हा स्वराज्य निर्मितीचा यत्न केला?" असा प्रश्न विचारात असतील. जेथे सोळा-सतरा वर्षाच्या वयात शिवाजी महाराजांनी सवंगड्यासोबत स्वराज्याचे तोरण उभारले, तेथे याकाळातील युवक आपल्या गड-किल्ल्यांना दारूचे अड्डे बनवून महाराष्ट्रातील किल्ल्यांची विटंबना करीत आहेत. सरकारी यंत्रणासोबत जोपर्यंतर सामान्य पर्यटक जबाबदारीने वागणार नाही तोपर्यंतर आपली पर्यटनस्थळे बकालच दिसतील.

शिवकुंजाच्यासमोर कमानी मशीद आहे. मशिदीचे "कमानी" हे नाव कदाचित मशिदीच्या टपावरील धनुष्यसारख्या आकारामुळे मिळाले असावे. कमानी मशिदीपुढे खालील बाजूस कमानी टाके आहे. हे  टाके आकाराने गंगा-जमुना टाक्यापेक्षा मोठे आहे. महाराष्ट्रातील जवळपास सर्वच किल्ल्यांवर कातळात कोरलेल्या पाण्याच्या टाक्या आढळतात. गड बांधताना लागणाऱ्या दगडाची गरज पुरवतानाच पावसाचे पाणी साठवण्यासाठी अश्या टाक्या बांधल्या जात. शिवशाहीतील या साध्या  सरळ योजना गाव पातळीवर राबवल्यास दुष्काळासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागणार नाही.




**कमानी मशीद**

YouTube Link

कमानी मशीद : http://youtu.be/7S4yAliiHII

शिवकुंजासमोर काही अंतरावर हमामखाना आहे. हमामखान्याच्या वरील बाजूस सुर्यप्रकाशासाठी झरोखे ठेवले आहेत.

येथून पुढे शिवजन्मस्थानाची आपल्या सर्वांना परिचित असलेली दुमजली इमारत आहे. बाहेर चपला काढून आम्ही त्या पवित्र वास्तूमध्ये प्रवेश केला. या इमारतीच्या खालच्या खोलीत छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. या खोलीच्या लाकडी बंद दारातून आत डोकावल्यास समोर छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धाकृती पुतळा असून डावीकडे पाळणा बांधला आहे. शिवाजी महाराजांना वंदन करून आम्ही डावीकडील दगडी पायऱ्यानी वरील मजल्यावर गेलो.  दगडी बांधकाम असल्याने इमारतीत थंडावा जाणवत होता. या इमारतीला पुनर्बांधणीमुळे गतवैभव प्राप्त झाले आहे. इमारतीच्या खिडक्यातून बदामी तलाव, जुन्नर शहर आणि शिवकुंज असा आजूबाजूचा परिसर नजरेस पडतो. शिवाजी महाराज जिजाऊच्या पोटी असताना शहाजी महाराज आदिलशाहीत होते. ते सततच्या आक्रमण आणि लढायापासून गरोदर असलेल्या जिजाऊचे संरक्षण कसे करता येईल या चिंतेत असत. शिवनेरी किल्ल्याच्या चारीबाजूचे सरळसोट कडे आणि किल्ल्याचे मजबूत बांधकाम यामुळे शहाजी महाराजांनी जिजाऊना शिवनेरीवर हलवले.



## हमामखाना

YouTube Link

हमामखाना: http://youtu.be/0q2FzY8To2I

शिवनेरी किल्ला हा तसा वर्षभर पर्यटकांच्या गर्दीने फुललेला असतो. अनेक शाळांच्या सहली येथे नियमित येत असतात. गर्दीमुळे या शिवजन्मस्थानाच्या इमारतीबाहेर रांग लावून उभे असलेल्या पर्यटकांचे छायाचित्र मी इंटरनेटवर पहिले होते पण भल्या पहाटे शिवनेरी चढल्याने आम्हाला गर्दी

टाळता आली. शिवजन्माचे सौभाग्य लाभलेल्या त्या इमारतीत काही काळ आम्हाला शांत बसता आले.



शिवजन्मस्थळ

YouTube Link

शिवजन्मस्थळ: http://youtu.be/tmS29LHAJvY

शिवजन्मस्थानाच्या समोरील परिसर दगडी बांधकाम आणि सुशोभित रोपांमुळे आल्हाददायक वाटला. येथून आम्ही शिवजन्मस्थानाच्या इमारतीसमोरील बदामी टाकेच्या दिशेने गेलो. बदामी टाके मात्र कोरडेठाक पडले होते. बदामी टाक्याच्या उजवीकडची वाट कडेलोट टोकाजवळ घेवून जाते. या वाटेने आम्ही ५ मिनिटात कडेलोट टोकाजवळ पोहोचलो. सुमारे दिड हजार फुट उंचीच्या ह्या कड्याचा उपयोग हा गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी होत असे. सूर्यप्रकाशात धुक्याची शाल पांघरलेले जुन्नर शहर आता कुठे जागे होत होते. जुन्नर एस.टी. आगार, आगाराजवळील छत्रपती शिवाजी महाराजांचा चौकातील पुतळा, आम्ही पहाटे काळोखात आणि थंडीत कुडकुडत कापलेला शिवनेरी किल्ल्याकडे येणारा मार्ग हे सारे काही दिसले.








१. बदामी टाके

२. कडेलोट टोक

३. कडेलोट टोकावरून दिसणारे जुन्नर शहर

| |
|---|
| YouTube Link<br><br>बदामी टाके: http://youtu.be/j93x1EDK4KQ |

| |
|---|
| YouTube Link<br><br>कडेलोट टोक: http://youtu.be/KiYC11IcJy4 |

कडेलोट टोकावरून मागे फिरून आम्ही आमच्या शिवनेरी भ्रमणाच्या शेवटच्या टप्प्याकडे जाऊ लागलो. शिवकुंजाच्या मागील पायवाटेने आम्ही शिवनेरीच्या सर्वोच्च टोक असलेल्या टेकडीवर चढू लागलो. ५-१० मिनिटात आम्ही शिवनेरी किल्ल्याच्या सर्वोच्च ठिकाणी होतो. येथून शिवकुंज, शिवजन्मस्थान, कमानी मशीद, बदामी टाके, कडेलोट टोक असा प्रदेश निहाळता येतो. या टेकडीवर आम्ही इदगाह नामक वास्तू जवळ पोहोचलो. ही घुमटाकार वास्तू पाहता क्षणीच आपले लक्ष वेधून घेते. इदगाहच्या पूर्वेकडील दरवाज्यावर उर्दू भाषेत काही मजकूर कोरला आहे.



१. इदगाह

२. इदगाहच्या भिंतीवरील पर्यटकांची नावे

३. इदगाहच्या मधील आयताकृती चौथर्याच्या खुणा

४. कोळी चौथरा

इदगाहच्या आतील बाजूस पूर्वी आयताकृती चौथरा असल्याची चिन्हे दिसतात. येथील भिंतीवर अंबरखाना, हमामखाना आणि कडेलोटच्या भिंतीप्रमाणेच पर्यटकांनी नावे लिहिलेली आढळली. गडावर जाण्यासाठी चांगल्या पायऱ्या असाव्या, रोपवे सारख्या सुविधा असाव्या असे आपल्या सर्वांना वाटते पण पर्यटकाची सोय अनेकवेळा त्या वास्तूंच्याच मुळावर उठते. महाराष्ट्रातील किल्ल्यांचा आपल्या विरुद्ध वापर होवू नये यासाठी इंग्रजांनी महाराष्ट्रातील अनेक

किल्ल्यांवर जाणारे मार्ग सुरुंग लावून चिणून काढले, त्यामुळे काही किल्ले चढणे फार अवघड झाले आहे. पर्यटकांनी रंगवलेल्या किल्ल्यांच्या भिंती पाहिल्यावर काही वेळेस इंग्रजांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील अनेक किल्ले बांधले, काही किल्ल्यांची नावे बदलली पण कधी स्वतःचे, शहाजी महारांजांचे किंवा जिजाऊचे नाव कोणत्या किल्ल्याला दिले नाही. आपले नाव ऐतिहासिक वास्तूवर लिहिताना अश्या पर्यटकांना असा कोणता असुरी आनंद मिळतो हे मला अद्याप कळले नाही. अश्या पर्यटकांच्या विचारसरणीची कींव करावीशी वाटते.

इदगाहपासून काही पावलांवर कोळी चौथरा आहे. १६५० मध्ये मोगलांविरूद्ध येथील कोळयांनी बंड केले, यात मोगलांचा विजय झाला. ज्याठिकाणी मोगलांनी हजारो कोळयांची निर्घृण हत्या केली तेथे हे स्मारक बांधले गेले.

कोळी चौथराच्या डावीकडील वाटेने आम्ही अंबरखान्यासमोर उतरलो. किल्ल्याचा घेर आटोपशीर असल्याने दोन तासात शिवनेरी आरामात पाहून होतो. किल्ला फिरून ९:१५च्या सुमारास आम्ही अंबरखान्यासमोर पोहोचलो. सुर्योदयापूर्वी गड चढल्याने शिवाई देवीचे मंदिर, मंदिराजवळील लेण्या आणि शिवनेरीचे आकर्षण असलेले ७ दरवाजे पाहता आले नव्हते. तेच पाहून आम्ही शिवनेरी भ्रमणाची सांगता करणार होतो.




१. कुलूप दरवाजा
२. मेणा दरवाजा
३. शिवाई देवी दरवाजा

कुलूप दरवाजा, मेणा दरवाजानंतर डावीकडे एका पायवाटेने उतरून आम्ही शिवाई देवी दरवाजातून शिवाई देवीच्या मंदिरात प्रवेश केला. शिवाई देवीच्या नावावरूनच जिजाऊनी महाराजांना "शिवाजी" हे नाव दिले. शिवाई देवी मंदिरातील देवीचा मुखवटा हा शिवकाळातील आहे अशी माहिती मंदिरातील पुजारयांनी दिली. मंदिराच्या खालील बाजूस ६-७ लेण्या आहेत. बहुसंख्य लेण्या रिकाम्या असून शेवटच्या दोन अनुक्रमे बौध्द आणि हिंदू लेणी आहेत. लेण्याजवळील दगडांचे ढीग पाहून कदाचित येथे दरड कोसळण्याच्या घटना होत असाव्या असा

अंदाज येतो, त्यासंबधीचा चेतावणी फलक शिवनेरीच्या पायऱ्याच्या सुरुवातीस पहावयास मिळाला होता.



१. शिवाई देवी मंदिर

२. ३. ४. लेण्या

YouTube Link

लेण्या: http://youtu.be/U1xG_CPniqI

शिवाई देवी दरवाजा ते हत्ती दरवाजामधील भागात तटबंधी उभारण्याचे काम सुरु होते. अनेक शाळांच्या सहली आल्याने गड उतरताना थोड्या थोड्या अंतरावर लहान मुले एकमेकांचा हात धरत जोड्या बनवून शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली गड चढताना दिसले..

हत्ती दरवाजा, पिराचा दरवाजा, गणेश दरवाजा आणि महादरवाजामधून आम्ही ११ च्या सुमारास गडाखाली उतरलो



**१. हत्ती दरवाजा २. पिराचा दरवाजा**
**३. गणेश दरवाजा ४. महादरवाजा**

YouTube Link

सात दरवाजे: http://youtu.be/KuS0t69nBjM

पहाटे काळोखात बुडालेला परिसर आता सहलीसाठी येणारी मुले, पर्यटकांनी गजबजलेला होता. शालेय सहलीसाठी आलेल्या अनेक एस.टी बसेस रस्त्याच्या दुतर्फा उभ्या होत्या. दुपारी २:१५ ची परतीची बस असल्याने बराच वेळ होता. आम्ही हळूहळू पायीच जुन्नरकडे निघालो. वाटेत शिवनेरीच्या पूर्वेकडील लेण्या दुरूनच पाहिल्या. या लेण्यांना भेट देण्यासाठी शिवनेरीला साखळीच्या वाटेने जावे लागते. साखळीची वाट ही अवघड असल्याने सध्यातरी कुटुंबासोबत तेथे जाणे योग्य नव्हते.

जुन्नर येथील एका अल्पोपहारगृहात हलका नाश्ता केला. अल्पोपहारानंतरही परतीच्या बससाठी तब्बल १ तास वाट पहावी लागणार होती. वडिलांना फोन केल्यावर त्यांनी जवळच शिवसृष्टी नामक एक वास्तू असल्याचे सांगितले. १ तास बस आगारात वाट पाहण्यापेक्षा आम्ही काही नवीन पाहणे पसंद केले. एस.टी. आगारासमोरील रस्ताने चौकातील छत्रपति शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून सरळ गेल्यास ५ मिनिटावर ही वास्तू आहे. रस्त्यावरूनच बालशिवबांना स्वराज्य निर्मितीचे ध्येय दाखवणाऱ्या जिजाऊ आणि बालशिवबांचे पूर्णाकृती शिल्प दिसले. शिवसृष्टीत शिवाजी महाराजांच्या जन्माचे, बालपणाचे अनेक प्रसंग चितारलेले आहे. शिवनेरीला भेट देणाऱ्या फार कमी पर्यटकांची पावले येथे वळतात. शिवनेरीवर जाणार असल्यास निश्चितच या शिवसृष्टीला भेट द्यावी.



**१. शिवनेरीच्या पायऱ्या**

**२. चौकातील महाराजांचा पुतळा**

**३. जुन्नर शहरातून दिसणारा किल्ले शिवनेरी**

**४. शिवसृष्टी**

दुपारी २:१५ च्या बसने माळशेजमार्गे आम्ही ५ च्या सुमारास कल्याण गाठले आणि २०१५ वर्षातील या माझ्या पहिल्या ट्रेकची सांगता झाली..

YouTube Link

किल्ले शिवनेरी संपूर्ण: http://youtu.be/axpZbrCvj_c

# शिवनेरीचा इतिहास :

"जीर्णनगर", "जुन्नेर" म्हणजेच जुन्नर हे शहर इसवीसनपूर्व काळापासून प्रसिद्ध आहे. जुन्नर ही शकराजा नहपानाची राजधानी होती. सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी याने शकांचा नाश केला आणि जुन्नर व येथील सर्व परिसरावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. नाणेघाट हा पुरातन व्यापारी मार्ग, या मार्गावरून फार मोठ्या प्रमाणावर वाहतूक चालत असे. यावर नजर ठेवण्यासाठी या मार्गावर दुर्गांची निर्मीती करण्यात आली. सातवाहनांची सत्ता स्थिरावल्यानंतर या भागात अनेक ठिकाणी त्यांनी लेणी खोदवून घेतली. सातवाहनांनंतर शिवनेरी चालुक्य, राष्ट्रकूट या राजवटींच्या सत्तेखाली होता.

इ.स. ११७० ते १३०८ च्या सुमारास यादवांनी येथे आपले राज्य स्थापन केले आणि याच काळात शिवनेरीला गडाचे स्वरूप प्राप्त झाले. नंतर इ.स. १४४३ मध्ये मलिक उत्तुजार याने यादवांचा पराभव करून किल्ला सर केला. अशा प्रकारे किल्ला बहमनी राजवटीखाली आला. इ.स. १४७० मध्ये मलिक उत्तुजार प्रतिनिधी मलिक महंमद याने किल्ला नाकेबंदी करून पुन्हा सर केला. १४४६ मध्ये मलिक महंमदच्या वडिलांच्या मृत्युनंतर निजामशाहीची स्थापना झाली. पुढे १४९३ मध्ये राजधानी गडावरून अहमदनगरला हलवण्यात आली. इ.स. १५६५ मध्ये सुलतान मूर्तिजा निजामाने आपला भाऊ कासीम याला या गडावर कैदेत ठेवले होते. यानंतर १५९५ मध्ये किल्ला व जुन्नर प्रांत मालोजी राजे भोसले यांच्याकडे आला. जिजामाता गरोदर असताना जाधवरावांनी ५०० स्वार त्यांच्या

सोबत देऊन त्यांना रातोरात शिवनेरीवर घेऊन गेले. ‘शिवनेरी गडावर श्रीभवानी सिवाई, तीस नवस जिजाऊने केला जे आपल्याला पुत्र झाला तर तुझें नांव ठेवीन, त्याऊपर शिवाजीराजे यांचा जन्म जाला. शके १५५६ क्षये नाम संवत्सरे वैशाख शुद्ध पंचमी चंद्रवार’.

इ.स. १६३२ मध्ये शिवरायांनी गड सोडला आणि १६३७ मध्ये तो गड मोगलांच्या ताब्यात गेला. १६५० मध्ये मोगलांविरूद्ध येथील कोळयांनी बंड केले, यात मोगलांचा विजय झाला. इ.स. १६७३ मध्ये शिवरायांनी शिवनेरीचा किल्लेदार अजीजखान याला फितवून किल्ल्याला माळ लावून सर करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

इ.स. १६७८ मध्ये जुन्नर प्रांत लुटला गेला आणि मराठ्यांनी किल्ला घेण्याचा प्रयत्न केला. मात्र अपयश पदरात पडले. पुढे ४० वर्षांनंतर १७१६ मध्ये शाहुमहाराजांनी किल्ला मराठेशाहीत आणला व नंतर तो पेशव्यांकडे हस्तांतरीत करण्यात आला.

माहिती सौजन्य: www.trekshitiz.com

# गडावर जाणाऱ्या वाटा :

गडावर जाण्याचे दोन प्रमुख मार्ग जुन्नर गावातूनच जातात.

१) राजमार्ग / सात दरवाज्यांची वाट :-

महाराजांच्या पुतळयापासून डाव्या बाजूच्या रस्त्याने चालत गेल्यास डांबरी रस्ता आपणास गडाच्या पायऱ्यांपाशी घेऊन जातो. या वाटेने गडावर येतांना सात दरवाजे लागतात.

२) साखळीची वाट :-

या वाटेने गडावर यायचे झाल्यास जुन्नर शहरात शिरल्यानंतर नव्या बसस्टँड समोरील रस्त्याने शिवपुतळयापाशी यावे. येथे चार रस्ते एकत्र मिळतात.डाव्या बाजूस जाणाऱ्या रस्त्याने साधारणत: एक किलोमीटर गेल्यावर रस्त्याच्या उजव्या कडेला एक मंदिर लागते. मंदिरासमोरून जाणारी मळलेली पायवाट थेट शिवनेरी किल्ल्याच्या एका कातळभिंतीपाशी घेऊन जाते. भिंतीला लावलेल्या साखळीच्या साह्याने आणि कातळात खोदलेल्या पायऱ्यांच्या साह्याने वर पोहोचता येते. ही वाट थोडी अवघड असून गडावर पोहोचण्यास पाऊण तास लागतो.

माहिती सौजन्य: www.trekshitiz.com


शिवनेरी
उ
जुन्नरकडे
कडेलोट
बदामी
तलाव
शिवजन्मस्थान
टाके व
कमान
लेणी
लेणी
शिवकुंज
(बालशिवाजी व
जिजामाता पुतळा)
साखळीची
वाट
जमुना टाके
गंगा टाके
लेणी
पाण्याची टाकी
कुलूप दरवाजा
मेणा दरवाजा
कोळी चौथरा
इदगा
अंबारखाना
पाण्याची टाकी
TreKshitiZ.com
हत्ती दरवाजा
लेणी
जुन्नरकडे
पिराचा दरवाजा
शिवाई मंदिर
महादरवाजा
शिवाईदरवाजा
गणेश दरवाजा

# ई साहित्य प्रतिष्ठान

दक्षिण भारत हा भव्य मंदिरांसाठी प्रसिद्ध आहे. एका एका मंदिराची उंची, भव्यता आणि श्रीमंती पहात आणि ऐकत रहावी. म्हणून तर पर्यटक दक्षिणेची मंदिरं पहायला जातात. दक्षिणात्य लोकांना या मंदिरांचा फ़ार अभिमान आहे. काहीसा गर्वही. असायलाच हवा.

पण ती मंदिरं उत्तरेतहून आलेल्या आक्रमक वावटळीपासून सुरक्षित राहिली याचं श्रेय मात्र मराठी लोकांनी अभिमानाने घ्यायला हवं. मुघलशाही, कुतुबशाही , आदिलशाही अशा बड्या बड्या शाह्यांशी एक हाती मुकाबला करून आम्ही मराठ्यांनी तंजावर ते पेशावर मराठेशाही स्थापन केली. आमच्या या किल्ल्यांनी आमच्या पूर्वजांनी एक संरक्षक भिंत उभी केली म्हणून दक्षिण सुरक्षित राहिली. सर्वच मराठी जण लढाईला गेले असतील असे नाही. पण काहींनी रसद पोचवली असेल. आणि काहींनी घाम गाळून दणकट किल्ले बांधले असतील. थोडे थोडके नाही तिनशेंहून अधिक कडक किल्ले. शोभेचे नाही. रणकंदनी किल्ले. आमनेसामनेच्या युद्धात जिंकणं अशक्य असे किल्ले. प्रत्येक किल्ल्याची गुंतागुंतीची रचना. प्रत्येक किल्ल्याची वेगवेगळी शक्तीस्थानं. प्रत्येक किल्ला एक ऊर्जास्थान. एक शक्तीस्थळ. मुडद्यासारख्या मनालाही उभारी देईल असं. या किल्ल्यांचा आम्हाला गर्व आहे. हे किल्ले हे आमच्या तरुणांसाठी मंदिरंच आहेत. आई भवानीची शक्ती मंदिरं.

ई साहित्य प्रतिष्ठानने या प्रत्येक शक्तीस्थळाचं स्वतंत्र ई पुस्तक बनवण्याचं काम हाती घेतलं. म्हणता म्हणता हजार हात पुढे सरसावले. नचिकेत जोशीपासून सुरू झालेल्या या योजनेत माधुरी नाईक, अरविंद नाईक, पंकज घारे, ओंकार ओक अशा तरूण लेखकांच्या फ़ळीत आता भास्कर नारकर, संकल्प चौधरी असे ताज्या दमाचे शिलेदार सामिल होत आहेत. या पुस्तिकांतून नव्या ट्रेकर्सना मार्गदर्शन तर होतेच पण विदेशात असलेल्या किंवा वयानुरूप

ट्रेकिंगपासून दूर असलेल्यांना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळतो. त्यामुळे या पुस्तिका फ़ार आनंदाने वाचल्या जातात.

या पुस्तिका प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोहोचल्याच पाहिजेत. आम्ही त्यासाठी लाखों लोकांना या मेलने पाठवतो. पण कोट्यवधी मराठी लोकांपर्यंत त्या न्यायच्या तर त्यासाठीही हजार हात हवेत. तुमच्या ओळखीच्या तरूण मंडळींना या अभियानात सामिल करून घ्या. त्यांचे ई मेल पत्ते कळवा. त्यांना पुस्तके द्या. आता ही पुस्तके मोबाईलवरही वाचता येतात. www.esahity.com वरून डाऊन लोड करा. शिवाय नवनवीन apps येत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठानचं app लवकरच येत आहे.

मराठी ही केवळ भाषा नाही. ती एक वृत्ती आहे. एक परंपरा. एक वारसा. त्याचं जतन करूया. सर्व राजकारणापासून दूर राहून. पुढच्या पिढ्यांना या समृद्ध वारशाचा लाभ घेऊ द्या. त्यासाठी पैसे नकोत. फ़ार वेळही नका देऊ.

कृपया आपल्या ओळखीच्या दहा मंडळींचे ई मेल पत्ते कळवा. आमचे VIP सभासद होण्यासाठी एवढंच पुरेसं आहे.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com